दैनिक गाववाला
# गावकरी
खबऱ्या
मुख्य संपादक -गजानन देठे पाटील

जालना | वर्ष-१ | अंक ५६ | रविवार दि.०१ मार्च २०२६ | MHMAR/25/A4368 | पृष्ठे ४ | मुल्ये २/- | dethegajanan7@gmail.com

## जालना शहरातील धडक कारवाई

**कापड दुकानातून २१ तलवारी जप्त; एकाविरुद्ध गुन्हा दाखल**

गावकरी

जालना : शहरात अवैधरित्या शस्त्रसाठा ठेवल्याप्रकरणी पोलिसांनी मोठी कारवाई करत एका कापड दुकानातून तब्बल २१ तलवारी जप्त केल्या. या प्रकरणी दुकान मालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शहरातील गजबजलेल्या भागातील एका कापड दुकानात बेकायदे शीरपणे धारदार शस्त्रांचा साठा असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकला असता दुकानाच्या मागील खोलीत २१ तलवारी लपवून ठेवलेल्या आढळून आल्या. तत्काळ त्या जप्त करण्यात आल्या.या प्रकरणी संबंधित दुकान मालकाविरुद्ध

भारतीय शस्त्र अधिनियम (Arms Act) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तलवारी विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या की इतर कोणत्या उद्देशाने साठवण्यात आल्या होत्या, याचा तपास पोलिस करत आहेत.शहरात शांतता व कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांनी अशा प्रकारच्या बेकायदेशीर शस्त्रसाठ्यांवर कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. दरम्यान, या कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांकडून पोलिसांच्या तत्परतेचे स्वागत करण्यात येत आहे.

# धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी एवढ्या जगात माय मानतो मराठी

गावकरी

**खेमराज शरणांगत.**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधान भवन, मुंबई येथे 'मराठी भाषा गौरव दिना'निमित्त आयोजित, 'जावे विनोदाच्या गावा... उलगडूया अभिजात मराठी साहित्यातील विनोदाचे दालन' कार्यक्रम येथे प्रमुख उपस्थिती दर्शवली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त उपस्थितांना मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या तसेच कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन केले. शिवाय अतिशय सुंदर, समर्पक आणि भावस्पर्शी कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल विधिमंडळाचे आभार मानले. कविता, गीते, अभिवाचन आणि विनोदाच्या माध्यमातून मराठी भाषेच्या विविध छटा उलगडणारा हा

कार्यक्रम मंत्रमुग्ध करणारा होता, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केले.पूर्वीच्या काळातील भाषणे व्यंगात्मक आणि विनोदी असत; मात्र दुर्दैवाने आज विनोदाला अस्मितेशी जोडले जाते, त्यामुळे त्यातील निखळ आनंद आणि मर्म हरवत असल्याची खंत मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केली.महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वभाषेचा अभिमान शिकविला. मराठी भाषा शुद्ध आणि प्रमाणित व्हावी यासाठी त्यांनी शब्दकोश निर्माण करून एक प्रमाण भाषा समाजाला दिली. संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांच्या परंपरेतून मराठी भाषेची समृद्ध यात्रा आपल्याला अनुभवता येते. 'लीळाचरित्र'सारख्या आद्य ग्रंथातून मराठी भाषा अभिजात असल्याचे स्पष्ट होते, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिला, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले. महाराष्ट्राच्या प्रत्येक भागातील बोलीभाषेचा स्वतंत्र गोडवा जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.मराठी भाषा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचावी, तिच्यातील अभिजात साहित्य, लोककला, लोकगीत आणि लोकनाट्य यांचा व्यापक प्रसार व्हावा, यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची आवश्यकता आहे. मराठी भाषेने दिलेल्या अमूल्य देणगीचे संवर्धन करून ती पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे हे आपले कर्तव्य आहे. मराठी ही ज्ञानभाषा म्हणून अधिक बळकट व्हावी आणि तिचे संवर्धन अखंड सुरू राहावे, असे असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.यावेळी विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, मंत्री चंद्रकांत पाटील, मंत्री ॲड. आशिष शेलार, मंत्री उदय सामंत, दिग्दर्शक केदार शिंदे, अभिनेते हृषिकेश जोशी व इतर मान्यवर उपस्थित होते.

## अजित दादा पवार यांच्या अपघाती निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात सध्या संशयाचे काहूर

गावकरी

**खेमराज शरणांगत.भंडारा:** आमदार रोहित पवार यांना एफआयआर (FIR) नोंदवताना येणारे अडथळे पाहून मनसे अध्यक्ष राज ठाकरे आता कमालीचे आक्रमक झाले आहेत. त्यांनी थेट राज्याच्या नवनियुक्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनाच या प्रकरणात लक्ष घालण्याचे आवाहन केले आहे. राज ठाकरे यांच्या विधानातील टोकदार मुद्दे:तक्रारीला अडथळा का?: 'अजित दादांच्या घरच्यांनाच जर या अपघाताबाबत संशय असेल आणि चौकशी नीट व्हावी यासाठी ते एफआयआर करू पाहत असतील, तर

सरकारकडून त्यात अडथळे का आणले जात आहेत?' असा रोकठोक सवाल राज ठाकरेंनी विचारला.सुनेत्रा वहिनींना साद: राज ठाकरे म्हणाले, 'सुनेत्रा पवार आज राज्याच्या उपमुख्यमंत्री म्हणून त्या खुर्चीवर बसल्या आहेत. त्यांनी या गोष्टीचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. शेवटी अजित दादा हे केवळ नेते नव्हते, तर त्यांचे पती होते. त्यांच्या मृत्यूचे सत्य समोर येणे ही त्यांची पहिली जबाबदारी आहे.'सत्तेचा वापर सत्याशाठी करा: कौटुंबिक नात्यापलीकडे जाऊन एक गृहमंत्री आणि उपमुख्यमंत्री म्हणून सुनेत्रा वहिनींनी पोलिसांना योग्य तपासाचे आदेश द्यावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.शंकेची पाल चुकचुकतेय: 'जर सरकार तक्रारच नोंदवून घेत नसेल, तर याचा अर्थ काहीतरी लपवण्याचा प्रयत्न होतोय का?' अशी शंकाही राज यांनी उपस्थित केली.नाते विरुद्ध कर्तव्य:राज ठाकरेंनी सुनेत्रा वहिनींना त्यांच्या 'पत्नी' आणि 'उपमुख्यमंत्री' अशा दोन्ही नात्यांची आणि कर्तव्याची जाणीव करून दिली आहे. अजित दादांच्या मृत्यूचे गूढ उकलण्यासाठी आता सुनेत्रा पवार काय पाऊल उचलतात, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.मित्रांनो, राज ठाकरेंनी सुनेत्रा वहिनींना दिलेल्या या सल्ल्याबद्दल तुम्हाला काय वाटते? उपमुख्यमंत्री म्हणून त्या या प्रकरणाचा नि:पक्षपाती तपास करतील का?

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य सचिव एम. देवेंद्र सिंग निलंबित

### आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मांडला हक्कभंगाचा प्रस्ताव,

गावकरी

भंडारा: खेमराज शरणांगत विधानसभेच्या कामकाजाला तसेच मंत्र्यांना गृहीत धरणे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्यसचिव एम. देवेंद्र सिंग यांना महागात पडले असून २६ फेब्रुवारी रोजी विधानसभेत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने राज्य शासनाने एम. देवेंद्र सिंग यांना निलंबित केले आहे. सामान्य प्रशासन विभागाने २७ फेब्रुवारी रोजी तत्संबंधाने आदेश निर्गमित केला आहे. २६ फेब्रुवारी रोजी विधानसभेत राजुरा विधानसभेतील प्रदूषणाच्या प्रश्नावर अर्धा तास चर्चा झाली. या चर्चेला उत्तर देताना पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांना ब्रिफिंग साठी

बोलावले असता त्यांनी स्पष्ट नकार दिला असे विधानसभागृहात सांगितले. ही बाब अतिशय गंभीर असल्याचे सांगत आ. सुधीर मुनगंटीवार यांनी एम. देवेंद्र सिंग यांच्यावर कारवाईची मागणी केली. यावेळी तालिका सभापती दिलीप लांडे यांनी त्यांच्यावर तात्काळ निलंबनाची कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार आज २७ फेब्रुवारी रोजी त्यांच्या निलंबनाचा आदेश राज्य शासनाने निर्गमित केला आहे. आ. सुधीर मुनगंटीवार यांनी मांडला हक्कभंगाचा प्रस्ताव.दरम्यान आ सुधीर मुनगंटीवार यांनी २७ फेब्रुवारी रोजी विधानसभेत एम देवेंद्र सिंग यांच्या विरोधात हक्कभंगाचा प्रस्ताव मांडला. यावेळी बोलताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, विधानसभागृह हे लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून जनतेच्या प्रश्नांचे निराकरण रण्यासाठीचे सर्वोच्च व सर्वभौम व्यासपीठ आहे. अशा पवित्र सभागृहात मांडण्यात आलेल्या लोक हिताच्या विषयावर उत्तर देण्यासाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांना ब्रिफिंगसाठी उपस्थित राहण्यास नकार देणे हा केवळ प्रशासनिक निष्काळजीपणा नसून विधानसभेच्या अधिकार व विशेषाधिकारांचा अवमान करणारी गंभीर बाब आहे.मंत्रीमहोदयांना विषयावरील संपूर्ण माहिती उपलब्ध करून देणे ही संबंधित अधिकाऱ्यांची वैधानिक व प्रशासकीय जबाबदारी आहे. त्या कर्तव्यात कसूर केल्न अप्रत्यक्षपणे विधानसभेच्या कार्यात अडथळा निर्माण करण्यात आला आहे. त्यामुळे ही कृती सभागृहाच्या विशेषाधिकारांचा भंग आहे.त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ चे सदस्य सचिव यांच्या विरुद्ध हक्कभंगाचा प्रस्ताव स्वीकारून हा विषय विशेषाधिकार समितीकडे पुढील चौकशी व कारवाईसाठी पाठवावा अशी मागणी आ. मुनगंटीवार यांनी केली. हे प्रकरण निश्चितपणे गंभीर असून या प्रकरणी शासनाची भूमिका जाणून घेत पुढील कारवाई करण्याचे आश्वासन विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिले.

## श्री संत एकनाथ महाराज नाथ षष्ठी पायी दिंडी सोहळा

गावकरी

सिल्लोड तालुका प्रतिनिधी महादू रामभाऊ गुंजाळ आज घाटनांद्रा येथे श्री संत एकनाथ महाराज नाथ षष्ठी पायी दिंडी सोहळा श्री क्षेत्र गोंदेगाव पांडे नगर तालुका जामनेर ते महाशेव पैठण उंटवाली के पितृ चरण नामदेवराव शंकरराव मोहिते यांच्या समृद्धी प्रीतीर्थ पायी दिंडी सोहळा ह भ पंडित संतोष महाराज मोहिते श्रीदुर्गीकर यांच्या अध्यक्षतेखाली ही दिंडी शेंदुर्णीकर यांच्या अध्यक्षतेखाली ही पैठण येथे जात असून सनी त्या दिंडीची पंगत व श्री पूजा मांडगाव ग्रामपंचायत सदस्य भगवान गुंजाळ यांच्यावतीने दिंडीतील भाविकांचा

सत्कार व यथाशक्ती महाप्रसाद पंगत चे आयोजन घाटनांद्रा येथे करण्यात आले होते यावेळेस गणपत कृष्णा जाधव लक्ष्मण रावसिंग सुरे, विष्णू गजानन सुलताने तुकाराम पाटील जाधव रामभाऊ सुगराजी.गुंजाळ अभिनव गुंजाळ यांच्यासह दिंडीतील भाविकांचा सत्कार करण्यात आला व महा अपंग प्रसादाचा कार्यक्रम भगवान गुंजाळ ग्रामपंचायत सदस्य मांडगाव यांच्यातर्फे करण्यात आला व दिंडीचा दर्शन घेऊन सनी दिंडीची महा सेवा करण्यात आली

## बदनापूरमध्ये पान टपरीतून अवैध देशी दारू विक्री?

गावकरी

बदापूर तालुका प्रतिनिधी शंकर चेडे: बदनापूर शहरात कायदा व सुव्यवस्थेला धक्का देणारी गंभीर बाब समोर आली आहे. मुख्य परिसरातील एका पान टपरीतून चक्क अवैधरित्या देशी दारूची विक्री होत असल्याची धक्कादायक माहिती समोर येत आहे. स्थानिक नागरिकांनी याबाबत तीव्र संताप व्यक्त केला असून पोलिस व उत्पादन शुल्क विभागाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.काय आहे प्रकरण? मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित पान टपरीवर उघडपणे देशी दारूची विक्री केली जात आहे. काही युवकांना तेथे बाटल्या विकत घेताना पाहिल्याचे स्थानिकांनी सांगितले. ही विक्री परवानगीशिवाय सुरू असल्याचा आरोप आहे. प्रशासनाचे दुर्लक्ष? स्थानिकांच्या मते, वारंवार तक्रारी करूनही

ठोस कारवाई होत नसल्याने संशय निर्माण झाला आहे. जर हे प्रकार उघडपणे सुरू असतील, तर संबंधित विभागांचे दुर्लक्ष का? असा सवाल नागरिक करत आहेत.कायद्यानुसार कारवाई अपेक्षितअवैध मद्यविक्री हा गुन्हा असून थावर कडक कारवाईची तरतूद आहे. त्यामुळे संबंधित पान टपरीवर ताकाळ छापा टाकून दोषींवर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

## चकलांबा विद्युत मंडळाच्या हलगर्जीपणामुळे नागरिक त्रस्त; वारंवार खंडित वीजेमुळे जनावरांचे हाल

गावकरी

गेवराई प्रतिनिधी : (गफ्फर पठाण )गेवराई तालुक्यातील चकलांबा सबस्टेशन अंतर्गत येणाऱ्या गावांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वीजपुरवठा सतत ये-जा होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. अनियमित वीजपुरवठ्यामुळे दैनंदिन कामकाज विस्कळीत झाले असून शेतकरी व ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.वारंवार खंडित होणाऱ्या वीजेमुळे पाणीपुरवठा योजनांवर परिणाम झाला आहे. विहिरी व बोअरवेलवरील मोटारी सुरळीत चालत नसल्याने जनावरांना पाणी मिळण्यात अडथळे निर्माण झाले आहेत. परिणामी अनेक ठिकाणी जनावरे तहानलेली राहण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्यांच्या पिकांनाही फटका बसत असल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली आहे.ग्रामस्थांच्या मते, सबस्टेशनमध्ये तांत्रिक बिघाड किंवा देखभालीअभावी ही समस्या वारंवार निर्माण होत आहे. संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही काही ग्रामस्थांनी दिला आहे.दरम्यान, विद्युत मंडळाने याबाबत तातडीने उपाययोजना करून गावांना नियमित वीजपुरवठा करावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## नगर पंचायत जिवती येथे भाजपाची सत्ता असताना देखील राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे अमर राठोड यांची बांधकाम सभापती पदी निवड

गावकरी

जिवती,२७,मागील सात महिन्यापूर्वी जिवतीच्या नगराध्यक्षा कविता आडे यांच्यावर भाजप मध्ये प्रवेश केलेल्या कॉंग्रेस वराकाच्या नगरसेवकानी अविश्वास प्रस्ताव दाखल करून कविता आडे यांना पदावरून हटवून भाजप ने गोंडवाना गणतंत्र पार्टीला सोबत घेऊन सत्ता स्थापन केली:::.तेव्हा एकही सदस्य संख्या नसताना कॉंगसचे चार आणि राष्ट्रवादी कांग्रेस चे तीन अशा सात लोकांनी भाजप मध्ये प्रवेश केला होता:.परंतु ही सत्ता स्थापन झाल्यानंतर काही महिन्यांनी विषय समितीच्या निवडणुकीची घोषणा जिल्हाधिकाऱ्यांनी केली:तोपर्यंत भाजप च्या नगरसेवकाने पक्षाचा गट स्थापन करून गटनेता बनवला नाही:त्यामुळे

जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्याकडे राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे नोंदणीकृत गटनेते असलेले अमर राठोड यांनी कॉंग्रेस पक्षाच्या सोबतीने बांधकाम सभापती पदासाठी उमेदवारी अर्ज दाखल केला:त्यांच्या विरोधात एकही अर्ज प्राप्त न झाल्यामुळे राष्ट्रवादी कांग्रेस पक्षाचे नगरसेवक तथा गटनेता अमर राठोड यांची बांधकाम सभापती म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली..त्याबद्दल नवनिर्वाचित बांधकाम सभापती यांचे अभिनंदन करण्यात येत आहे:::.कविता आडे यांच्यावर अविश्वास अविश्वास दाखल करून फक्त गट स्थापन न केल्याने भाजपला मात्र सभापती पदाला मुकावे लागले.

## वंचित बहुजन आघाडी परतूर तालुका कार्यकारिणी जाहीर

### आष्टी येथे दिमाखदार कार्यक्रमात हनुमंत दादा मोरे यांची तालुका अध्यक्षपदी निवड

गावकरी

जिल्हा जालना प्रतिनिधी पवन आल्हाड सामाजिक परिवर्तनाच्या ध्येयाने प्रेरित आणि बहुजन समाजाच्या सशक्तीकरणासाठी कटिबद्ध असलेल्या वंचित बहुजन आघाडीच्या परतूर तालुका कार्यकारिणीची घोषणा आष्टी येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. या ठिकाणी परतूर तालुका अध्यक्षपदी हनुमंत दादा मोरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि आत्मविश्वास निर्माण झाला आहे.याचवेळी तालुका उपाध्यक्षपदी नामदेवजी नाचन, संकेत प्रधान, तसेच शेख कदीर शेख हुसेन यांची निवड जाहीर करण्यात आली. संघटक म्हणून बालासाहेब फुलारी, सचिवपदी

कृष्णा थोरात, तर तालुका व सर्कल सहाय्यक निरीक्षकपदी गणेश वैद्य यांची जबाबदारी सोपविण्यात आली. नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कार्यक्रमात आष्टी येथील युवा उपाध्यक्ष शाखेर मणियार व उपाध्यक्ष राजू शेख यांचाही विशेष सत्कार करण्यात आला.या प्रसंगी जिल्हाध्यक्ष रामप्रसाद थोरात सर, ज्येष्ठ नेते चोखा नाना सौंदर्य, जिल्हा सचिव जमीर भाई शेख,ज्ञानेश्वर थोरात तसेच सामाजिक कार्यकर्ते भगवान वाघमारे आणि भागवत चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांनी आपल्या भाषणातून संघटन बळकट करण्याचे, तळागाळातील प्रश्न सोडविण्यासाठी कटिबद्ध राहण्याचे आणि सामाजिक न्यायाच्या लढ्यात अधिक जोमाने काम करण्याचे आवाहन केले. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून परतूर तालुक्यात संघटन अधिक मजबूत होईल आणि बहुजन समाजाच्या हक्कांसाठी प्रभावी लढा उभारला जाईल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.हा सोहळा केवळ पदनियुक्तीचा नव्हता, तर सामाजिक परिवर्तनाच्या नव्या पर्वाची नांदी ठरला.

## संपादकीय

# आव्हान आहेच; पण क्षमताही!

राज्याच्या उपमुख्यमंत्रिपदापाठोपाठ आता राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून सुनेत्रा पवार यांनी बहुतांश घेतली आहेत. हे दोन्ही निर्णय लोकांना अपेक्षितच होते. सुनेत्राताईच्या पाठी राजकारणाचा माहेर आणि सासरचा वारसा आहे. सामान्य कार्यकर्त्यांचादेखील त्यांना पाठिंबा असल्याचे चित्र आहे. तथापि, त्यांच्या पक्षातील आणि इतरही अनेक राजकीय धुरंधर मात्र ताई सक्रिय राजकारणात नवख्या असल्याचे मानतात. कुरापती काढण्यातही असे धुरंधर माहिर असतात. मात्र, अजित पवार यांच्याइतक्याच खमकेपणाने राज्य आणि पक्ष दोन्ही सांभाळू शकतो हे सुनेत्राताईना सिद्ध करावे लागणार आहे आणि तेच मोठे आव्हान असू शकेल. त्याची चुणूक पत्रकार परिषदेने त्यांना दाखवून दिली असावी.राष्ट्रीय अध्यक्षपदी निवडीनंतर त्यांची पहिलीच पत्रकार परिषद झाली. अध्यक्ष म्हणून त्या संवाद साधतील ही माध्यमांची अपेक्षा पुरती फोल ठरली. त्यांच्या संवादाशिवायच पत्रकार परिषद संपवली गेली. ताईंची मन:स्थिती ठीक नाही असे माध्यम प्रतिनिधींना सांगितले जात होते असे माध्यमांत प्रसिद्ध झालेल्या वृत्तात म्हटले आहे. त्यांच्याच पक्षातील काही नेत्यांनी त्यांना बोलू दिले नाही, असाही याचा एक अर्थ काढला गेला. आमदार सरोज आहिरे यांचा दावा त्या अर्थाची पुष्टी करणारा ठरू शकेल. कार्यकर्त्यांना अजित पवारांपासून दूर ठेवले जात होते. सुनेत्राताईच्या काळात तरी असे घडू नये, अशा भावना त्यांनी माध्यमांकडे व्यक्त केल्या.भविष्यात असे अनेक दावे-प्रतिदावे, कुरघोड्या आणि एकमेकांची उणीदुणी ताईंसमोर येतील. त्यातील राजकारण ओळखून वागण्याचे कसब त्यांना दाखवावे लागेल. अजित पवार यांच्या धक्कादायक निधनानंतर पक्षावर ताबा मिळवण्याच्या दोन्ही राष्ट्रवादी पक्षांमधील अनेकांच्या महत्त्वाकांक्षांना पंख फुटलेले जनतेने पाहिले. अनेकांचे तसे प्रयत्न जनतेपासून लपून राहिलेले नव्हते. अपघाताच्या दुर्दैवी घटनेनंतर पहिल्या काही तासांतच पडद्यामागच्या हालचालींनी कमालीचा वेग घेतल्याचे नंतर जनतेसमोर आले होते.

अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाच्या संभाव्य अध्यक्षपदाच्या नावाची एक शक्यता व्यक्त केली म्हणून खुलासा करण्याची वेळ भाजपचे ज्येष्ठ नेते पीयूष गोयल यांच्यावर आली होती. आता ती सूत्रे ताईकडे सोपवली गेली आहेत. तेव्हा त्यांच्या राजकारणातील नवखेपणाचा बाऊ करून पक्षावर नियंत्रण मिळवण्याची महत्त्वाकांक्षा काहीअंशी तरी साध्य केली जाऊ शकेल अशा हालचाली पक्षांतर्गत यापुढेही होण्याची शक्यता नाकारली जाऊ शकणार नाही.

# सलाम शेख यांचा आंदोलनाचा इशारा.

## सिहोरा येथे पाण्याचा ठणठणात ; कोट्यावधी रुपयाची जल जीवन मिशन योजना ठरली पांढरा हत्ती

गावकरी

भंडारा:खेमराज शरणांगत, तुमसर : येथून ९ किलोमीटर अंतरावर व वैनगंगा नदीच्या तीरावर असलेल्या कवलेवाडा डंम्प लगत पिपरी चुनी येथे जल जीवन मिशन योजने अंतर्गत उभारण्यात आलेली पाणीपुरवठा योजना आज सिहोरा ग्रामवासियांसाठी पांढरा हत्ती ठरली आहे. दिवसें दिवस पाण्याची टंचाई वाढु लागली आहे.ग्रामवासियांची ओरड व पाणी टंचाईची तीव्रता लक्षात घेता ग्रामपंचायत सिहोराचे सरपंच सलाम भाई शेख यांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. सिहोरा गावासाठी सन १९७६ ला सिंदपूरी येथे उभारण्यात आलेल्या पाणी पुरवठा योजनेची अवस्था जीर्ण होत चालली आहे. ती योजना सिंदपुरी नाल्यावर उभारण्यात



आल्यामुळे पाहिजे तेवढा पाण्याचा पुरवठा होऊ शकत नाही. नाला कोरडा पडल्यामुळे नाल्याला वाळवंटाचे स्वरूप आले आहे. आतापासूनच सिहोरा गावात पाण्याची तीव्रता भासू लागली आहे. पाणी टंचाईमुळे ग्रामवासियांच्या मनात प्रशासनाच्या विरोधात असंतोष खदखदत आहे. सध्या सिहोरा गावाची लोकसंख्या १० हजाराचे वर आहे. सिहोरा गावाची वाढती लोकसंख्या व दरवर्षी भासणारी पाण्याची तीव्रता लक्षात घेता पिपरी येथील वैनगंगेच्या तीरावर जल जीवन मिशन योजनेअंतर्गत कोट्यावधी रुपयाची योजना उभारण्यात आली आहे. पाईपलाईनचे काम पिपरी ते सिहोरा पर्यंत पूर्ण झाले आहे. याच पिपरी गावावरुन तुमसर शहराला पाण्याचा पुरवठा होत आहे तेव्हा सिहोरा गावालाा कां नाही असा प्रश्न सिहोरा वासियांनी उपस्थित केला आहे. संबंधित विभागाने पाण्याची टंचाई लक्षात घेता जल जीवन मिशन योजने अंतर्गत पिपरी चुन्नी येथे उभारण्यात आलेली पाणी पुरवठा योजना त्वरित सुरू करण्यात यावी अन्यथा प्रशासन व संबंधित विभागाच्या विरोधात आंदोलन उभारण्यात येईल असा खरमरीत इशारा ग्रामपंचायत सिहोराचे सरपंच सलाम भाई शेख व ग्रामवासियांनी दिला आहे. सदर प्रतिनिधीने संबंधित विभागाशी संपर्क साधला असता कंत्राटदाराला केलेल्या कामाचे बिल मिळाले नाहीत.अपुरे कामे पूर्ण केल्यावरही बिल मिळण्याची हमी नसल्यामुळे कंत्राटदाराने कामे थांबवल्याची माहिती मिळाली आहे.ही परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रात असल्याचे सांगीतले जात आहे.

# बोगस डॉक्टर विरुध्द तात्काळ कार्यवाही करा - अप्पर जिल्हाधिकारी मिसाळ

गावकरी

अप्पर जिल्हाधिकारी, जालना यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची बैठक पार पडली. या बैठकीमध्ये बोगस डॉक्टर कार्यवाही बाबत चर्चा झाली. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी यांनी यावेळी निर्देशित केले की 'बोगस डॉक्टर विरुध्द कार्यवाही करा ' तसेच तालुकास्तरीय समितीच्या नियमित बैठका घेऊन बोगस वैद्यकिय

व्यवसाय करणा-यांवर कार्यवाही करावी. सरपंच/ग्राम पंचायत अधिकारी यांनी ग्रामपंचायत अंतर्गत अनाधिकृत वैद्यकिय व्यवसायिक आढळून आल्यास तात्काळ गटविकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांना प्रतिबंधात्मक कार्यवाहीसाठी माहिती द्यावी. गटविकास अधिकारी व तालुका आरोग्य अधिकारी यांची तालुकास्तरीय समिती आहे. बोगस डॉक्टर संदर्भात कार्यवाही करण्यासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, आरोग्य वैद्यकिय अधिकारी म.न.पा. यांनी आपआपल्या कार्यक्षेत्रात आढळुन आलेल्या बोगस वैद्यकिय व्यवसायिक यांच्या विरुध्द सक्त कायदेशिर कार्यवाही करण्याचे आदेश अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ यांनी दिले. जिल्हयातील ग्रामीण भागामध्ये एकुण खाजगी वैद्यकिय व्यवसायिक ५९४ असुन त्यापैकी ३१६ यांनी बॉम्बे नर्सिंग अंतर्गत नोंदणी केले आहे. नोंदणी/नुतणीकरण प्रस्ताव ५९ आहेत. २६ बोगस डॉक्टरांवर कार्यवाही करण्यांत आली आहे. त्यापैकी ०६ एफआयआर दाखल केल्या असुन एक प्रकरण न्यायप्रविष्ठ आहेत उर्वरित खाजगी वैद्यकिय व्यवसायिकांना व संबंधीत ग्रामपंचायत यांना नोटीसा दिल्या आहेत. सर्व खाजगी वैद्यकिय व्यवसायिकांना आरोग्य विभागातर्फे जाहिर आवाहन करण्यांत येते की, आपल्या रुग्णालयाच्या बोर्ड/पाटीवर आपली शैक्षणिक अर्हता पदवी, पदविका व उच्च पदवी शिक्षण नमुद करावी उदा. MBBS MD.,MBBS MS, MBBS Paediatrics, MBBS DGO, BAMS MD, BAMS MS, BAMS DGO, BUMS, BHMS, BDS आदि. जेणे करुन रुग्णांमध्ये संभ्रम निर्माण होणार नाही.यावेळी विविध विभागाचे शासकिय सदस्य अधिकारी वर्ग, अशासकिय सदस्य व कर्मचारीवृंद उपस्थित होते.

# एम.आय.डि.सी.पैठण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

### ठाकरे सेनेच्या उपनेत्याने एकनाथ साखर

### कारखान्याची यंत्रसामुग्री गहाण ठेऊन सोळा कोटी केले हडप

गावकरी

**दै.गावकरी गाववाला पैठण प्रतिनिधी रामनाथ गोर्डे पाटील.:**पैठण(प्रतिनिधी) पैठण तालुक्यातील ढाकेफळ बालानगर येथील शेतकरी पंढरीनाथ शिसोदेपाटील(भाऊ) शाम राव सटवाजी गोर्डे पाटील(बालानगर) बंडू पाटील (आमरपुर वाघुडी)यानी मोठ्या कष्टाने घरची भाकरीची शिदोरी खाऊन उन.पाऊस न पाहता तालुकाभर पायी फिरून शेअर जमा करून तालुक्यात सहकारी तत्वावर श्री.संत एकनाथ सह.साखर कारखानाची वास्तु ऊभी केली.मात्र तालुक्यातील संचालक व्यवस्थापक पुढाऱ्यांनी श्री संत एकनाथ सहकारी साखर कारखाना पैठण तालुक्यातील (सीए) सुपुत्र शिवसेना उपनेते (उबाठा) सचीनविक्रम घायाळ सचीनघायाळ शुगर.प्रा.लि. यांना भाडेतत्वार श्री संत एकनाथ सहकारी साखर कारखाना सचीनघायाळ याना चालविण्यासाठी दिला कारखान्याची यंत्रसामुग्री बुलढाणाअर्बन बंकेला गहाण ठेऊन (३०) कोटीरूपये कर्ज उचलुन सोळाकोटी रुपयेवर डल्ला मारून खात्यावर जमा केले सचीनघायाळ त्यांनी बुलढाणा अर्बन पतसंस्था बँक अडचणीत आणली याबाबत ठाकरेसेनेचे उपनेते

सचीनघायाळ व व्यवस्था पक मंडळीवर पैठण एमआयडीसी पोलीस ठाण्यात (२६) फेब्रुवारी रात्री उशिरा जिल्हा विशेष लेखा परिक्षक वर्ग (१) सहकारी संस्था छ. संभाजीनगर अधिकारी सुरेशपंडितराव काकडे यांनी सचीनघायाळ व भागधारक विरूध्द फिर्याद दाखल केली. प्रादेशिक साखर संचालक छ.संभाजीनगर यांनी सुरेश पंडितराव काकडे

यांची श्री संत एकनाथ सहकारी साखर कारखाना एकनाथनगर पैठण लेखा परिक्षणासाठी नियुक्ती केली होती सुरेशकाकडे यांनी साखर व्यवस्थापक सचीनघायाळ सह व्यवस्थापन यांना चाचणी लेखा परिक्षणासाठी अवश्क कागदपत्राची मागणी केली होती त्यास साखर व्यवस्थापकानी प्रतिसाद

# जवाहरनगर पोलीस स्टेशन हद्दीतील मनोरुग्णास येरवडा येथे उपचारासाठी माणुसकी टिम चे मदतकार्य

गावकरी

**उपसंपादक योगेश पाटील निकम** :सदर मनोरुग्ण व्यक्ती नामे सौरभ हिरोबा देवर्षी राहणार बसंतनगर जवहार कालनी परीसरातील स्थानिक नागरिकांनी व त्याचे मामा सुरेश औरंगे यांनी पोलीस स्टेशन येथे वारंवार माहिती दिली कि सदर व्यक्ती हा हिंसक वागत आहे.व दगडे हातात घेऊन मारहाण करित आहे.व रात्री बेरात्री परिसरात फिरतो जोरजोरात ओरडतो रोडवरील चालु वाहनांना आडवतो त्यापासून लोकांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आहे.व तो बऱ्याच दिवसापासून मनोरुग्ण सारखे वागत आहे.त्याचे आई वडील वृद्ध मयत आहे.मामाच त्याचा सांभाळ करीत होते त्यांना देखील मारहाण करतो.मामांनी त्यास प्रेरणा हास्पीटल येथे उपचार घेतले आहे परंतु त्याचा मानसिक आजार आता जास्त झाल्याने तो घिगाणा घालत आहे.अशि माहिती परिसरातील नागरिकांनी व त्यांचे मामा यांनी जवाहरनगर पो.स्टे ला दिली असता जवाहरनगर पोलीस स्टेशन चे

वरिष्ठ पोलीस निरिक्षक सचिन कुंभार यांना दिली जवाहरनगर पोलीसांनी सदर मनोरुग्णासाठि काम करणाऱ्या सु-लक्ष्मी सेवाभावी संस्थेचे समाजसेवक सुमित पंडित यांना सदर रुग्णाची माहिती दिली.सुमित यांनी तात्काळ पो.स्टे. येथे जाऊन वसंतनगर परिसरात पेसंट ला शोधुन शाहनीशा केल्यावर सदर रुग्ण सौरभ हा मोठमोठे केस व दाढि वाढकुन जोरजोराने ओरडत होता.सदर रुग्णाला ताब्यात घेणे मोठे अवघड झाले होतो.तो हिंसक वृत्ती चा असल्याने कोन्हाला जवळिह येवुन देत नव्हता सदर मनोरुग्ण यास उपचारासाठी पुणे येथे घेऊन जावे सोपे नव्हते सुमित पंडित यांनी शासकीय रुग्णालय घाटि मानस उपचार तज्ञ श्री प्रसाद देशपांडे यांचा सल्ला घेतला व त्यास जवाहरनगर पोलीसांच्या मदतीने त्यास माणुसकी समुहाच्या टिम ने त्यास हात पाय बांधून ताब्यात घेतले व शासकीय रुग्णालय संभाजीनगर घाटी रुग्णालयातील मानसोपचारतज्ज्ञ यांनी औषधोपचार करून त्यास पुढिल उपचारासाठी प्रादेशिक मनोरुग्णालय पुणे येथे नेण्याचा सल्या डॉक्टरांनी दिल्यानंतर कायदेशीर कागदोपही पुर्तता करुन आज त्यास येरवडा पुणे येथे १०८ अँबुलंस वाहनाने उपचारासाठी माणुसकी टिम च्या सभासदांनी मदतकार्य करुन उपचारासाठी दाखल केले.सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस उपायुक्त प्रशांत स्वामी झोन-२,मशीन कल्याणकर, सा.पो. आयुक्त,सचिन कुंभार पोलीस निरीक्षक जवाहर नगर,मारुती खीझारे पो.उप निरिक्षक,जमधडे,राजेश चव्हाण,१०८ अँबुलंस डि.एम.अतुल मुरगकर,ए डि.एम.सचिन पालवे,डॉ किरण देशमुख,माणुसकी समुहाचे सुमित पंडित,संचालीका माणुसकी वृध्द सेवालय पुजा पंडित आदिनी मदतकार्य केले.माणुसकी समुहाचे कार्य मनोरुग्णानसाठि लाख मोलाचे पोलीसांना होतीय मोठि मदत मनोरुग्णांच्या जवळ देखील कोणी जायला तयार होत.हे आम्ही स्वत: अनुभवले नाही ते खूप सेन्सिटिव्ह असतात कोणत्याही क्षणी काहीही करू शकतात परंतु समाजसेवक सुमित पंडित करत असलेल्या रंजत्या गांजल्यांच्या सेवा ही खरंच वाखाडणे योग्य आहे. मनोरुग्णानसाठि ते स्वत:दाढी कटिंग व स्वच्छ अघोळ घालुन त्यांना माणसात आणतात व त्यांना हक्काचा निवारा मिळवुन देतात आज प्रत्यक्ष मी माझ्या डोळ्यांनी त्यांना या मनोरुग्णाच्या कोणी जवळही जाण्याची हिंमत करत नव्हते त्याप्रसंगी समाजसेवक सुमित पंडित यांनी मोठे हिमतीने त्या कायदेशीर प्रक्रीया करुन उपचारासाठी पुणे येथे दाखल केले आहे.पोलीसांना सुमित पंडित हे रात्री बेरात्री फोन केला की नि स्वार्थ भावनेने मदतीसाठी तयार असतात त्यांची पोलीसांना वेळोवळी मदत होत आहे.त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार समाजात अशी खूप कमी लोक आहेत की ते दुसऱ्यासाठी जगतात.. -

सचिन कुंभार पोलिस निरीक्षक जवाहरनगर पोलीस स्टेशन

# माय मराठी म्हणजे मातृत्वाचा मधाळ गोडवा

गावकरी

**कार्यकारी सहसंपादक - परशुराममुळे**

पूर्णा कावेरी शिक्षण संस्था संचलित स्वामी विवेकानंद विदयालय व रामेश्वर इंग्लिश स्कूल या शाळेत वि. वा. शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जल्म दिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला

व्यासपीठावरील मान्यवरांच्या हस्ते कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली .. मराठी भाषा गौरव दिनांनिमित्त व्यासपीठावरून सांहित्यिक पुष्प गुंफतांना जेष्ठ सांहित्यिक 'श्रीधर बच्छाव'यांनी कुसुमाग्रज यांच्या साहित्यावर सविस्तरपणे मार्गदर्शन केले त्याचं बरोबर 'मराठी भाषा गरज आणि महत्व'या विषयावर सखोल असे मार्गदर्शन केले आपल्या मार्गदर्शन पर भाषणात ते म्हणालेत की कुसुमाग्रज (वि.वा. शिरवाडकर) हे मराठी साहित्यातील एक प्रमुख व्यक्तिमत्व होते.त्यांचे पुर्ण नाव नाव विष्णू वामन शिरवाडकर होते. कुसुमाग्रज हे त्यांचे काव्यनाम आहे.कवी कुसुमाग्रज यांनी कविता, नाटके, व्याख्याने, आणि समीक्षा यांसारख्या विविध साहित्यिक क्षेत्रात योगदान दिले आहे.त्यांच्या प्रमुख काव्य संग्रहांमध्ये 'विसाखा', 'किनारा', 'चाफा', आणि 'छंदोमयी' यांचा समावेश आहे.त्यांनी 'नटसम्राट', 'वैजयंती', आणि 'कित्ती जवळ येती' यांसारखी प्रसिद्ध नाटके आहेत१९७४ मध्ये साहित्य अकादमी पुरस्कार१९८७ मध्ये ज्ञानपीठ पुरस्कार१९८८ मध्ये पद्मभूषण १९९१ मध्ये महाराष्ट्र कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिन २७ फेब्रुवारी हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो त्यांच्या साहित्याने मराठी भाषा आणि संस्कृतीला समृद्ध केले आहे.मराठी भाषा अतिशय लवचिक आहे. एका शब्दाचे अनेक अर्थ आहेत आणि एकाच

अर्थाचे अनेक शब्द आहेत. यामुळेच मराठी भाषा समृद्ध झाली आहे. मराठी भाषा सर्व महाराष्ट्राची जरी एक असली तरी ती दर बाराकोसावर बदलते. लेखी भाषा तीच असली तरी बोलीभाषेत फरक होतो. तिचे हेल वेगळे होतात. मराठीत अनेक पोटभाषा आहेत. जळगाव, धुळे आणि नाशिक येथे अहिराणी, पूर्व खानदेशात खानदेशी, विदर्भात वऱ्हाडी किंवा विदर्भी, कोकणात कोकणी तर गोव्यात कोंकणी भाषा बोलली जाते. पराभी, कोळी, किरिस्ताव, कुणबी, आग्री, ठाकरी, बाणकोटी, मावळी, मालवणी, अशा अनेक भाषा कोकणी भाषेत येतात. नायगाव, वसई, डहाणू भागात वडवली बोलली जाते. नालासोपारा आणि विरार भागांत सामवेदी बोलली जाते. दक्षिण भारतात तंजावर मराठी, नामदेव मराठी आणि भावसार मराठी बोलली जाते. महाराष्ट्र गुजरात सीमेवर डांगी भाषा बोलली जाते. अशी ही मराठी भाषा नुसती भारतातच नव्हे तर मौरिशस आणि इझायलमध्येही बोलली जाते.आता गंमत अशी आहे की ही भाषा दर पंचवीस किलोमीटरवरवेगळी भासते. आपण कोल्हापुरला गेलो तर तिथे मराठी भाषाखणखणीत, स्पष्ट आणि नेमकी वर्मावर बोट ठेवणारी! तिथल्या स्त्रियाही म्हणतात, 'आम्ही आलो! आम्ही जातो, मी जातो!' सातान्याला भाषा थोडी नरम होते. लंवगी मिरचीचा झटका जाऊन सातान्याच्य तंबाखूची गुंगी त्यात डोकावते. तरी पण 'लई' 'चिक्कार' 'आयला' वगैरे म्हणजे खास सातारी ढंग! कोकणात हीच मराठी अगदी मऊ होते.मराठी भाषेचा उगम संस्कृतपासून तर तिचे व्याकरण आणि वाक्य रचना प्राकृत आणि पालीपासून तयार झाले आहे.काळ बदलला तसे मराठी भाषेत अनेक बदल झाले आहेत. मराठी भाषेत अरबी, फारशी,कानडी, हिंदी, इंग्रजी अशा अनेक भाषांतले शब्द आले आहेत.आज इंग्रजीला फार महत्व आहे. यात कोणाला दोष द्यायचा? कारण महाविद्यालयीन आणि उच्च शिक्षण सर्व इंग्रजीतून होते. पदव्या मिळवून तरुण मंडळी परदेशात उच्च शिक्षणासाठी जातात. तिथे इंग्रजी भाषाच बोलावी व लिहावी लागते. असो.. पण म्हणून आपण आपल्या मातृभाषेला विसरून जायचे का? परभाषा जरी अवगत झाली तरी आपल्या मराठीला विसरु नका. प्रत्येक मराठी माणसाला मराठी भाषा बोलता, लिहिता-वाचता आली पाहिजे. आपल्या मराठीतसुद्धा खूप विषयांवर लेखन झाले आहे. शास्त्र विज्ञान, ललित साहित्य खूप आहे. त्याचा उपयोग करू या, आपल्या ज्ञानात वाढ करू या! म्हणून मराठीत फक्त बोलू नका तर लिहूनही ही भाषा आणखी समृद्ध करुया. शेवटी सांहित्यिक श्रीधर बच्छाव यांनी कुसुमाग्रज यांची 'कणा'कविता सादर केलीमराठी भाषा गौरव दिना निमित्त भाषण गीत पोवाडा निबंध स्पर्धा. रांगोळी स्पर्धा मनोरंजक खेळ आयोजित करण्यात आले होते.... व्यासपीठावर डॉ. आशिष पाटील सर डॉ सिमाताई पाटील मॅडम. आदरणीय अजिंक्य पाटील सर मुख्याध्यापिका माधवी निमळ्. प्रिंसिपल जगदिश कापुरे जेष्ठ मराठी शिक्षक नितीन दाडगे.अरुणा सोनवणे भूषण पिताबंरे यांची व्यासपिठावर प्रमुख उपस्थिती होती

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता नववी सेमीच्या विद्यार्थीनी दिव्या लोखंडे व सोनाली पाचरणे यांनी केले तर आभार प्रदर्शन सहशिक्षिका हिना कुरैशी मॅडम यांनी केले.

दैनिक गाववाला गावकरी खबऱ्या
गाववाला गावकरी खबऱ्या हे दैनिक श्री गजानन चंदनराव देठे,राहणार घर क्रमांक १२३, जि.प. शाळेच्या समोर, मारुतीमंदिर रोड, गाडेगव्हाण, पोस्ट नामी ता. जाफराबाद, जालना, महाराष्ट्र - ४३१२०८ यांनी मुद्रक श्री आदिनाथ नारायण जाधव राहणार पार गल्ही, माळीवाडा, अहिल्यानगर, महाराष्ट्र - ४१४००१यांच्या मालकीच्या श्री बालाजी प्रिंटर्स,वारूळाचा मारुती रोड, नालेगाव, अहिल्यानगर,येथे छापून,घर क्रमांक १२३, जि.प. शाळेच्या समोर, मारुतीमंदिर रोड, गाडेगव्हाण, पोस्ट नामी ता. जाफराबाद, जालना, महाराष्ट्र - ४३१२०८ येथे प्रकाशित केले ,(सर्व दावे जाफराबाद न्यायकक्षेत )
MHMAR/25/A4368 dethegajanan7@gmail.com

थोडक्यात

## शहरात वास्तव्यास असलेल्या कुटुंबांना मालकी हक्क पट्टे द्या.

गावकरी

**भंडारा: खेमराज शरणांगत,**

गोंदिया शहरातील गेली साडेतीन वर्षे नगरपरिषदेत प्रशासकराज होते. त्यामुळे शहरातील अनेक कामांना खीळ बसली होती. आता नगरपरिषदेत पदाधिकारी आरूढ झाले आहेत. त्यामुळे नगराध्यक्षांनी शहरातील समस्यांची दखल घेऊन त्या मार्गी लावाव्यात, अशी मागणी शहरातील नागरिक आणि सामाजिक संघटनांनी नगराध्यक्ष सचिन शेंडे यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. शिष्टमंडळात संयोजक तीर्थराज उके, मयुर मेश्राम, अध्यक्ष अनिल शरणागत, उपाध्यक्ष राजेश मेश्राम, कोषाध्यक्ष कैलाश शेंडे, सचिव अशोक बिसेन, गोपाल बनकर, ओमकार मदनकर, राहुल वट्टी, गणेश पटले, भक्तराज रंगारी, पवन मेश्राम, प्रदीप रामटेके, आशिष मेश्राम, प्रदीप जांभूळकर व छोटा गोंदिया, गोविंदपूर, संजयनगर येथील नागरिकांचा समावेश होता.

# मातीच्या आरोग्याकडे दुर्लक्ष झाल्यास जागतिक अन्नटंचाईची भीषण समस्या निर्माण होऊ शकते:- पद्मश्री डॉ पोपटराव पवार

गावकरी

**प्रतिनिधी :**

**( सुखदेव गायकवाड )**

रुरकी, उत्तराखंड :-चौथ्या जागतिक पाणी परिषदेत बोलताना पद्मश्री पोपटराव पवार यांनी मातीच्या आरोग्याकडे होणारे दुर्लक्ष भविष्यात जगासमोर गंभीर अन्नसंकट उभे करू शकते, असा इशारा दिला. ही परिषद रुरकी, उत्तरखंड येथे पार पडली.आपल्या मनोगतात त्यांनी स्पष्ट केले की, अति रासायनिक खतांचा वापर, तणनाशकांचा अतिरेक आणि शेतीमध्ये होणारा अति पाण्याचा वापर यामुळे मातीतील सेंद्रिय कर्ब झपाट्याने कमी होत आहे. यासोबतच कमी कालावधीत होणारा अतिवृष्टीचा पाऊस मातीतील सुपीक थर वाहून नेत असून, त्यामुळे मातीची पाणी धारण क्षमता कमी होत चालली

आहे. परिणामी, अन्नधान्य उत्पादनावर मोठा परिणाम होऊन जागतिक अन्नटंचाईची भीषण समस्या निर्माण होऊ शकते, असे त्यांनी सांगितले.या परिषदेस प्रमुख पाहुणे म्हणून जागतिक पाणी परिषदेचे महासंचालक डॉ. मार्क स्मिथ उपस्थित होते. तसेच युगल जोशी संचालक नीती आयोग,उमाशंकर पांडे पद्मश्री,राजीव रंजन मिश्रा महासंचालक नमामि गंगाशुद्धीकरण प्रकल्प, अनिल मिश्रा तांत्रिक मार्गदर्शक केंद्रीय जलशक्ती मंत्रालय वाय.आर .सत्यजित राव डायरेक्टर रुरकी आय.आय.टी. तसेच प्रोफेसर के. के. पंत डायरेक्टर यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. भारतासह सुमारे ८० देशांतील तज्ञ, जगातील ५४० प्रतिनिधी या परिषदेत सहभागी झाले होते. जगभरातील अनेक विद्यापीठांचे कुलगुरू आणि पाणी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या प्रमुख व्यक्तींनीही हजेरी लावली. डॉ. पवार यांनी आपल्या भाषणात हिवरे बाजारच्या शाश्वत ग्रामविकास मॉडेलचा विशेष उल्लेख केला. हिवरे बाजार येथे पाण्याच्या ताळेबंदावर आधारित पीक नियोजन, ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग आणि सामाजिक शिस्त यामुळे हवामान बदलाचा शेतीवर विपरीत परिणाम होत नसल्याचे त्यांनी सांगितले. पर्यावरण संतुलित ग्रामविकासाची संकल्पना राबविल्यामुळे प्रत्येक निर्णय ग्रामसभेत सर्वानुमते घेतला जातो, हे त्यांनी अधोरेखित केले. मातीतील सेंद्रिय कर्ब संवर्धनासाठी हिवरे बाजार येथे पहिली प्रयोगशाळा स्थापन करण्यात आली असून, दुसरी प्रयोगशाळा महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी येथे कार्यरत आहे, अशी माहिती त्यांनी दिली.

भविष्यातील पर्यावरणीय व अन्नसुरक्षेच्या संकटावर मात करण्यासाठी शालेय स्तरापासूनच अभ्यासक्रमात माती व पाणी संवर्धनाचा समावेश करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. जनसहभाग आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांच्या साहाय्यानेच शाश्वत विकास साध्य होऊ शकतो, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. ही परिषद पाणी व माती संवर्धनाच्या दृष्टीने जागतिक स्तरावर महत्त्वपूर्ण ठरली असून, भविष्यातील धोरणांसाठी दिशा देणारी ठरेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

# गावगाड्याच्या भ्रष्टाचाराला कंटाळून पिंपळगाव बारवच्या महिलेचे थेट पंतप्रधानांना साकडे!

गावकरी

भोकरदन (जालना): स्थानिक प्रशासनाकडून न्याय मिळत नसल्याने हताश झालेल्या सामान्य नागरिकांनी आता थेट दिल्लीच्या वेशीवर दस्तक देण्यास सुरुवात केली आहे. भोकरदन तालुक्या तील पिंपळगाव बारव येथील रहिवासी माधुरी प्रवीण जाधव पत्रकार यांनी ग्रामपंचा यतीच्या मनमानी कारभाराला कंटाळून थेट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्र लिहून तक्रार केली आहे. या पत्रामुळे जिल्हात खळबळ उडाली असून, स्थानिक राजकारणातही चर्चांना उधाण आले आहे.

**नेमकी तक्रार काय?**

माधुरी जाधव पत्रकार महाराष्ट्र लोक न्यूज यांनी पंतप्रधान कार्यालयाला (झेचज) पाठवलेल्या पत्रात ग्रामपंचायतीवर अतिशय गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी नमूद केले आहे की:

निधीचा गैरवापर: केंद्र सरकारच्या १५ व्या वित्त आयोगातून मिळालेल्या



प्रति,
श्री. नरेंद्रभाई मोदीजी,
पंतप्रधान महोदय,
पंतप्रधान कार्यालय (PMO)
साउथ ब्लॉक नवी दिल्ली-110011

विषय : सरपंच व ग्रामसेवक यांच्या मनमानी कारभाराची तक्रार व गावातील विकासाच्या मागण्याबाबत.

आदरणीय महोदय,

मी माधुरी प्रविण जाधव रा.पिंपळगाव बारव तालुका भोकरदन जिला जालना महाराष्ट्र येथील रहिवासी आपल्या या पत्राद्वारे आपल्याकडे अत्यंत खेदपूर्वक आणि गंभीर भावनेने विकासाच्या रखवालेच्या मागण्यासुद्धा तक्रार मांडत आहे.ग्रामसेवक गावातील सरपंच व ग्रामसेवक हे संगनमतो काम करत असून ग्रामसभेत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी न करता मनमानी कारभार करत आहेत. गावातील दुरवस्थेकडे लक्ष देण्याऐवजी भ्रष्टाचार सुरूच आहे. गावातील मूलभूत सुविधांचा अभाव असून ग्रामस्थांना होत असलेल्या त्रासाचा पाढाही त्यांनी या पत्रात वाचला आहे. गावातील अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, सांडपाण्याची व्यवस्था नसल्याने आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. स्मशानभूमीचे सुशोभीकरण आणि सौर दिवे बसवण्याची मागणीही त्यांनी या पत्राद्वारे केली आहे.धुरी जाधव निधीचा वापर वैयक्तिक फायद्यासाठी आणि निकृष्ट दर्जाच्या कामांसाठी केला जात आहे.पारदर्शकतेचा अभाव: ग्रामपंचायतीचे ऑडिट किंवा हिशोब सामान्य नागरिकांना दाखवले जात नाहीत. माहिती विचारल्यास टाळाटाळ केली जाते.निर्णयांची पायमल्ली: ग्रामसभेत घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी न करता सरपंच आणि ग्रामसेवक संगनमताने मनमानी कारभार करत आहेत.गावातील दुरवस्थेकडे वेधले लक्षकेवळ भ्रष्टाचारच नाही, तर गावातील मूलभूत सुविधांचा अभावामुळे ग्रामस्थांना होत असलेल्या त्रासाचा पाढाही त्यांनी या पत्रात वाचला आहे. गावातील अंतर्गत रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झाली असून, सांडपाण्याची व्यवस्था नसल्याने आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. स्मशानभूमीचे सुशोभीकरण आणि सौर दिवे बसवण्याची मागणीही त्यांनी या पत्राद्वारे केली आहे.धुरी जाधव

# विकासनगरला मिळणार मुख्य रोडच्या विकासाचा नवा बूस्टर!

गावकरी

**मुख्य कार्यकारी संपादक अभिजित सिद्धार्थ चव्हाण**

पुणे जिल्हा पिंपरी चिंचवड शहर प्रभाग क्रमांक १६ आज रोजी नेटके चौक ते शिंदे पेट्रोल पंप या मुख्य रस्त्याच्या कामासाठी सर्व नगरसेवक सौ. ऐश्वर्या राजेंद्र तरस (श्री. राजेंद्र बाळासाहेब तरस), श्री. धर्मपाल यशवंतराव तंतरपाळे, श्री. निलेश गुलाब तरस, सौ. रेश्मा बापुजी कातळे ( श्री. बापू दिनकर कातळे ) हे चारही नगरसेवक त्याच प्रमाणे स्थानिक नागरिक, महानगरपालिका प्रशासन, नगररचना व स्थापत्य विभाग त्याच बरोबर स्थानिक जेष्ठ कार्यकर्ते यांचा समन्वय साधून सविस्तर चर्चा करण्यात आली. नागरिकांचे अभिप्राय जाणून घेत गुणवत्तापूर्ण आणि नियोजनबद्ध काम करण्याचा निर्धार करण्यात आला आहे.विकास हा केवळ आश्वासन नसून:तो कृतीतून सिद्ध करायचा चारही नगरसेवकांचा संकल्प आहे.लवकरच हा रस्ता पूर्णत्वास जाईल,आणि विकासनगरला मिळेल अधिक सुरक्षित, सुबक आणि सोयीस्कर मुख्य रोड.

# कलावती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये अत्याधुनिक एमआरआय मशीनचे उद्घाटन;

## रुग्णांना मिळणार स्थानिक पातळीवर प्रगत तपासणी सुविधा

गावकरी

जालना शहरातील आरोग्यसेवेत मोठी भर घालत कलावती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल, जालना येथे अत्याधुनिक एमआरआय मशीनचे उद्घाटन पद्मश्री पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ वैद्यकीय तज्ज्ञ डॉ. हिम्मतराव बावस्कर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. या नव्या सुविधेमुळे जालना शहरासह संपूर्ण जिल्ह्यातील रुग्णांना आता एमआरआय तपासणीसाठी इतर शहरांमध्ये जाण्याची गरज कमी होणार असून, स्थानिक पातळीवरच अचूक व जलद निदानाची सुविधा उपलब्ध होणार आहे.एमआरआय मशीन ही आधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानातील अत्यंत महत्त्वाची

तपासणी पद्धती असून, मेंदू, मणका, सांधे व इतर अंतर्गत अवयवांच्या आजारांचे अचूक निदान करण्यासाठी ती उपयुक्त ठरते. या सुविधेमुळे रुग्णांना वेळेची बचत होणार असून उपचार प्रक्रिया अधिक जलद आणि प्रभावी होण्यास मदत होणार आहे.या उद्घाटन प्रसंगी हॉस्पिटलचे संचालक डॉ. कृष्णा कोरडे, डॉ.मच्छिंद्र तुकाराम असोरे, एमआरआय टेक्निशियन तसेच हॉस्पिटलमधील इतर डॉक्टर व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विजय पाटील जगताप यांचीही विशेष उपस्थिती लाभली.जालना जिल्ह्यात अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने कलावती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलने उचललेले हे महत्त्वाचे पाऊल असून, यामुळे जिल्ह्यातील आरोग्यसेवा अधिक सक्षम आणि आधुनिक होण्यास मोठी मदत होणार आहे. ही सुविधा जालना जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

# अभय योजना चालू करण्याच्या शिवशाही व्यापारी संघाच्या मागणीला यश श्री. युवराज दाखले

गावकरी

**मुख्य कार्यकारी संपादक अभिजित सिद्धार्थ चव्हाण**

पुणे जिल्हा पिंपरी चिंचवड शहर दिनांक २८ फेब्रुवारी २०२५ आज रोजी पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना पुणे महापालिकेच्या घर्तीवर मिळकतकर दंडामध्ये ७५% सुट देण्यासाठी अभय योजना चालू करण्याची मागणी मा आयुक्त साहेब यांना दिनांक ११-११-२०२५ रोजी निवेदनाद्वारे केली होती.या संदर्भात पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त व महापौर रविभाऊ लांडगे व विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी सकारात्मक भूमिका घेऊन पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना मिळकतकर दंडामध्ये ९०% सवलत दिली आहे. त्यांच्या या निर्णयामुळे नागरिकांना दिलासा मिळाला आहे. शिवशाही व्यापारी संघ या राज्यव्यापी संघटनेच्या वतीने संस्थापक अध्यक्ष लोकसेवक युवराज दाखले यांनी आभार मानले आहे.

शिवशाही व्यापारी संघ महाराष्ट्र राज्य
श्री. युवराज भगवान दाखले
संस्थापक/अध्यक्ष
*मंगळवार दिनांक ११-११-२०२५*
प्रति,
आयुक्त साहेब,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
सस्नेह जय महाराष्ट्र...
विषय:- पुणे महानगरपालिकेच्या घर्तीवर मिळकत कर दंडामध्ये ७५% सुट देण्यासाठी अभय योजना चालु करण्या बाबत.
महोदय, वरील विषयास अनुसरून आपणास सर्व सामान्य जनतेच्या वतीने मागणी करण्यात येत आहे की, आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिके लगत असलेल्या पुणे महानगरपालिकेने मिळकत करावर दंडामध्ये ७५% सुट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे त्यामुळे मिळकत कर थकीत मध्ये समाधान कारक वातावरण आहे त्यामुळे वसुली देखील होत आहे.
साहेब त्यामुळे आपल्या पिंपरी चिंचवड महापालिकेच्या माध्यमातून वरील योजना चालू करा सर्व सामान्य जनतेला दिलासा द्यावा अशी विनंती शिवशाही व्यापारी संघ या राज्यव्यापी संघटनेच्या वतीने करण्यात येत आहे.
आपला नंम्र
लोकसेवक युवराज दाखले
संस्थापक- अध्यक्ष शिवशाही व्यापारी संघ महाराष्ट्र राज्य
संपर्क नंबर 9922373059
कार्यालय : व्यापारी भवन नवीन मोशी, पिंपरी, पुणे. मो. 9922373059 / 8806717291
www.shivshahivyapari.com
शिवशाही व्यापारी संघ
अध्यक्ष अनावरण

# कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या विज्ञानाच्या जाणिवा व्यापक करणे व संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी विज्ञान दिनाचे आयोजन.

गावकरी

अंबड (प्रतिनिधी) कै.दत्ताजी भाले प्राथमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या विज्ञानाच्या जाणिवा व्यापक करण्यासाठी तसेच संशोधन वृत्तीला चालना देण्यासाठी सकाळच्या प्रार्थना सभेत विज्ञान दिन उत्साहात संपन्न झाले . कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मा.श्री.प्रदीपजी जोशी सर माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक श्री सुधाकर घायातडक सर विद्यासभा संयोजिका श्रीमती.रागिनी भाले मॅडम विज्ञान विभाग प्रमुख श्रीमती.अनुराधा भाकरे मॅडम, अभ्यासक्रम मंडळ प्रमुख श्रीमती.वायकोस मॅडम, माध्यमिक विभागाचे विज्ञान विभाग प्रमुख श्री.लक्ष्मीकांत सामग सर , तसेच सर्व शिक्षकवृंद उपस्थित होते. सर्वप्रथम , थोर शास्त्रज्ञ सी.व्ही. रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर पहिली ते चौथी च्या २१ विद्यार्थी. पाचवी ते सातवीच्या २८ विद्यार्थ्यांनी विविध वैज्ञानिक प्रयोग सादर केले. विविध आयुर्वेदिक वनस्पतीचे उपयोग, चंद्रयान -२, पवन ऊर्जा, जल ऊर्जा, आयुर्वेदिक चहा, हवेचे दाब, पाण्याचा पृष्ठीय ताण, ऑक्सीजन ज्वलनास मदत करते, पाण्याची घनता, हवेवर इंजिन चालते, वस्तू पाण्यात तरंगते, हवा जागा व्यापते, पदार्थ

विरघळणे, असे विविध प्रयोगाचे सादरीकरण झाले. यामध्ये विविध नंबर काढण्यात आले होते. त्यामध्ये प्रथम क्रमांक कु.ब्राम्ही जाणवे द्वितीय कु.स्वरा गिरी तृतीय चि.विक्रांत माळोदे उत्तेजनार्थ कु.शिवन्या टिंगळे .यानंतर श्री.प्रदीप जोशी सर यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना म्हणाले की, विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन अंगीकाराया विज्ञानाचे जेवढे फायदे तेवढे तोटे देखील आहे. त्यामुळे जीवनात विज्ञानामुळे होणाऱ्या विविध बदलांचा सकारात्मक ऊर्जा घेऊन कार्य करावे .राष्ट्रीय विज्ञान दिन आपल्याला विज्ञानाच्या महत्त्वाची जाणीव करून देतो. विज्ञानामुळेच आज मानवाचे जीवन अधिक सोयीस्कर व प्रगत झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून संशोधनाची आवड जोपासली पाहिजे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. योगेश दातीर सर यांनी केले आभार श्री अनिल चव्हाण यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली.

# प्रविण पिंपळेविरुद्ध खंडणीचा गुन्हा; फेसबुकवर बदनामी करून मागितले ५० लाख, जाफ्राबाद पोलिसांची मोठी कारवाई!

गावकरी

**जाफराबाद, परशुराम मुळे:**बनावट शासकीय कागदपत्रे तयार करून जमिनीचा व्यवहार रोखणे आणि संबंधित मालमत्ता वाचवण्यासाठी ५० लाख रुपयांच्या खंडणीची मागणी करणाऱ्या आरोपीविरुद्ध जाफ्राबाद पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांनी या मोठ्या षडयंत्राचा पर्दाफाश केला असून, आरोपीने प्रशासकीय यंत्रणेलाही चकवा देण्याचा प्रयत्न केल्याचे समोर आले आहे.**काय आहे मुख्य प्रकरण?** तक्रारदार दिपक बाबुराव वाकडे (५५) यांची जाफ्राबाद येथील ३२ एकर वडिलोपार्जित जमीन हडपण्याच्या किंवा त्यातून पैसे उकळण्याच्या उद्देशाने आरोपी प्रविण सुभाष पिंपळे (रा. सोनगिरी) याने एक अजब बनाव रचला. आरोपीने ७ जानेवारी १९७९ चे एक बनावट पत्र तयार

केले. विशेष म्हणजे, १९७९ साली संगणकाचा वापर नसतानाही हे पत्र संगणकीय 'फॉन्ट' मध्ये टाईप केलेले होते. याच एका तांत्रिक चुकीमुळे आरोपीचे पितळ उघडे पडले.राजकीय प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न तक्रारदार दिपक वाकडे यांच्या पत्नी जाफ्राबाद नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा आहेत. आरोपी प्रविण सुभाष पिंपळे याने तक्रारदाराची आणि त्यांच्या पत्नीची समाजात बदनामी करण्याच्या उद्देशाने बनावट कागदपत्रे फेसबुक आणि व्हॉट्सप स्टेटसवर पोस्ट केली. तुमची मालमत्ता बेकायदेशीर आहे अशा आशयाची पोस्ट टाकून तक्रारदाराला मानसिक त्रास दिला आणि मालमत्तेची विक्री होण्यात अडथळे निर्माण केले.**अनेक जण जाळ्यात अडकल्याची शक्यता :**तक्रारीनुसार, आरोपी प्रविण सुभाष पिंपळे याने अशाच प्रकारे खोटी कागदपत्रे तयार करून इतर० ते १० लोकांना देखील आपल्या जाळ्यात अडकवले आहे. खोटी कागदपत्रे सादर करून लोकांकडून खंडणी वसूल करण्याचा त्याचा मोठा कट असल्याचे तक्रारदाराने म्हटले आहे. आरोपीने केवळ तक्रारदाराचीच नाही, तर विभागीय आयुक्त कार्यालय (छत्रपती संभाजीनगर) आणि तहसील कार्यालयाची देखील बनावट शिक्के मारून फसवणूक केली आहे. गुन्ह्याची व्याप्ती आणि कलमे १५ सप्टेंबर २०२५ पासून सुरू असलेला हा छळाचा प्रकार अखेर पोलिसांत पोहोचला. पोलिसांनी आरोपी प्रविण सुभाष पिंपळे विरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (BNS) गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे :खंडणी: कलम ३०८(१),तयार ३०८ (२) (५० लाखांची मागणी केल्याबद्दल), बनावटगिरी: कलम ३३६, ३४०, ३३७ (खोटे शिक्के आणि कागदपत्रे केल्याबद्दल). इतर: कलम ६१ (२) (गुन्हेगारी कट रचणे) व माहिती तंत्रज्ञान कायद्याशी संबंधित कलमे. पोलीस निरीक्षक सतीश जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय राजधर पठाडे या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. या गुन्हात आरोपीला मदत करणारे इतर 'मास्टरमाइंड' कोण आहेत, याचाही शोध पोलीस घेत आहेत.

# नवेगाव-नागझिरा बफर झोन वाढविण्याचा प्रस्ताव नाही

## काही क्षेत्र कमी करण्याचा प्रस्ताव, केंद्राकडे, आमदार डॉ. परिणय फुके यांच्या प्रश्नावर वनमत्र्यांची ग्वाही,

गावकरी

**भंडारा : खेमराज शरणांगत,** भंडारा व गोंदिया जिल्हातील नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प परिसरातील बफर झोन वाढविण्याचा सध्या कोणताही विचार नसून, काही क्षेत्र कमी करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात येणार आहे. त्यासाठी स्वतंत्र नोडल अधिकारी नियुक्त केला जाईल, अशी ग्वाही वनमंत्री गणेश नाईक यांनी विधान परिषदेत दिली. आमदार डॉ. परिणय फुके यांनी या विषयाकडे सभागृहात लक्ष वेधले होते.२६ डिसेंबर २०२५ रोजी काढण्यात आलेल्या जीआरनुसार बफर क्षेत्राचे व्यवस्थापन व्याघ्र प्रकल्पाकडे वर्ग करण्यात आले. मात्र या निर्णयानंतर १८५ गावांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, असे आमदार डॉ. फुके यांनी निदर्शनास आणले. युनिफाईड कंट्रोल लागू झाल्यानंतर खासगी शेतीसाठी वन्यजीव विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र सक्तीचे होणार काय, बफर क्षेत्राचे स्पष्ट नकाशे व गावनिहाय माहिती कधी जाहीर केली जाणार, बफरमधील गावांचे कोणत्याही परिस्थितीत पुनर्वसन केले जाणार नाही याची लेखी हमी शासन देणार काय, तसेच पारंपरिक चराई हक्क अबाधित राहतील का, असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले.यासोबतच इको सेन्सिटिव्ह झोन (एडन) संदर्भातही गंभीर मुद्दे मांडण्यात आले. भंडारा जिल्हात ५ ते १० किलोमीटरपर्यंत एडन लागू करण्यात आल्यामुळे स्थानिक नागरिकांना विविध विकासकामांमध्ये अडचणी येत आहेत, असे त्यांनी सांगितले.

-मार्च, २०२६ | महाराष्ट्र विधानमंडळ, प्रथम अर्धसंकल्पीय अधिवेशन फेब्रुवारी-मार्च, २०२६ | महाराष्ट्र विधानमंडळ, प्रथम अर्धसंकल्पीय अ

बफर झोनचे एकूण क्षेत्र १,२४,१२७ हेक्टर असून त्यात सुमारे ६४,८६६ हेक्टर वनक्षेत्र व उर्वरित कोअर/बफर क्षेत्राचा समावेश आहे. त्यानंतर राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन व पर्यावरण, हवामान बदल विभागाने २३३३.३९ चौ.कि.मी. क्षेत्रवाढ केल्याने भंडारा व गोंदिया जिल्ह्याच्या सुमारे ५० टक्के भूभागावर विविध निर्बंध लागू झाल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली.२० सप्टेंबर २०२३ रोजी देवरी, सडकअर्जुनी, गोरेगाव नगर परिषद तसेच देवरी व गोरेगाव औद्योगिक क्षेत्र एडन मध्ये समाविष्ट करण्यात आले होते. औद्योगिक क्षेत्र वगळण्यासाठी दोन वर्षे पाठपुरावा करून ते वगळण्यात आले, असेही त्यांनी नमूद केले. ३१ डिसेंबर २०२५ रोजी प्रमुख मुख्य वनसंरक्षकांनी राज्य शासनाला क्षेत्र दुरुस्तीबाबत पत्र दिले असून ,२५ डिसेंबर २०२५ चा अहवाल केंद्रीय वन व पर्यावरण विभागाकडे कधी पाठवला जाणार, असा प्रश्नही उपस्थित करण्यात आला.केंद्र सरकारकडे प्रलंबित असलेल्या अशा अनेक प्रकरणांचा प्रभावी पाठपुरावा व्हावा यासाठी राज्य शासनाने स्वतंत्र अधिकारी नियुक्त करावा, अशी मागणी आमदार डॉ. परिणय फुके यांनी केली. वनमंत्र्यांनी बफर वाढविण्याचा प्रस्ताव नसल्याचे स्पष्ट करत, आवश्यक त्या दुरुस्तीसाठी केंद्राशी समन्वय साधला जाईल, असे आश्वासन दिले.जंगलातच मका लावावा **जंगलातच मका लावावा,** जेणेकरून वाघ बिबट्या बाहेर येणार नाही, अशी महत्त्वाची सूचना आमदार डॉ. फुके यांनी केली. भटक्या कुत्र्यांचा शहरात त्रास होतो, त्यांना जंगलात सोडणार का? असा प्रश्न सुद्धा डॉ. फुके यांनी उपस्थित केला. यावर वनमंत्री गणेश नाईक यांनी जंगलात सॅटेलाइट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असल्याचे सांगितले. बिबट्याबाबत सर्व यंत्रणा सतर्क असून व्याघ्र प्रकल्पात फळ- झाडे लावण्यात येणार आहे. जेणेकरून तेथील ससे वगैरे प्राण्यांना खाद्य मिळेल, असे नाईक म्हणाले.

## लग्नाचे आश्वासन देऊन प्रस्थापित केलेले संमतीचे संबंध म्हणजे बलात्कार नव्हे; औरंगाबाद खंडपीठाने रद्द केला पोक्सो आणि बलात्काराचा गुन्हा.

गावकरी

मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने एका महत्त्वपूर्ण सुनावणीदरम्यान बलात्काराचा आणि 'पोक्सो' (झजउडड) कायद्यांतर्गत दाखल झालेला एक गुन्हा रद्दबातल ठरवला आहे. न्यायमूर्ती एस. जी. चपळगावकर यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना स्पष्ट केले की, प्रेमसंबंधातून आणि दोन व्यक्तींच्या परस्पर संमतीने प्रस्थापित झालेले शारीरिक संबंध हे बलात्काराच्या गुन्ह्याखाली मोडत नाहीत.या प्रकरणाचे सविस्तर भाष्य करताना न्यायालयाने एक अत्यंत महत्त्वाचा कायदेशीर फरक अधोरेखित केला. केवळ परिस्थितीमुळे विवाहाचे दिलेले आश्वासन मोडणे आणि सुरुवातीपासूनच फसवणूक करण्याच्या उद्देशाने लग्नाचे खोटे आश्वासन देणे, या दोन भिन्न बाबी आहेत. प्रस्तुत प्रकरणात, आरोपीचा पहिल्या दिवसापासूनच तरुणीची फसवणूक करण्याचा

किंवा तिचे केवळ लैंगिक शोषण करण्याचा कोणताही हेतू होता, हे सिद्ध करणारे कोणतेही भक्कम पुरावे समोर आले नाहीत. त्यामुळे हे प्रकरण खोट्या आश्वासनावर आधारित शोषणाचे नसून परस्पर संमतीने प्रस्थापित झालेल्या संबंधांचे असल्याचे न्यायालयाने स्पष्ट केले.या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी आहे की, या संदर्भातील मूळ तक्रार (एफआयआर) छत्रपती संभाजीनगर शहरातील क्रांती चौक पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली होती. यामध्ये भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम ३७६ (२) (एन) आणि पोक्सो कायद्यातील कलमांन्वये आरोपीवर गुन्हे नोंदवण्यात आले होते. या कारवाईच्या विरोधात न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. प्राप्त माहितीसुार, तक्रारदार तरुणी आणि आरोपी हे दोघेही एकमेकांचे नातेवाईक असून त्यांच्यात अगोदरपासूनच प्रेमसंबंध होते.सुरुवातीच्या काळात या दोघांचीही एकमेकांसोबत विवाह करण्याची प्रामाणिक इच्छा होती. परंतु, त्यांच्या या निर्णयाला दोन्ही कुटुंबांकडून तीव्र विरोध झाला आणि याच कौटुंबिक विरोधामुळे त्यांचा विवाह संपन्न होऊ शकला नाही. विशेष म्हणजे, ज्यावेळी या प्रकरणी पोलिसांत अधिकृत तक्रार दाखल करण्यात आली, तेव्हा सदर तरुणी सज्ञान म्हणजेच अठरा वर्षांवरील होती, ही बाबही न्यायालयाने आपल्या निर्णयात प्रामुख्याने नमूद केली.याव्यतिरिक्त, पोलिसांत तक्रार (एफआयआर) दाखल करण्यासाठी झालेला मोठा विलंब, वैद्यकीय किंवा न्यायवैद्यकीय (फॉरेंसिक) पुराव्यांची कमतरता आणि स्वतः तक्रारदार तरुणीने दिलेला जबाब या सर्व तांत्रिक व कायदेशीर बाबींचे सखोल विश्लेषण न्यायालयाने केले. या सर्व परिस्थितीचा विचार करता, हा खटला पुढे चालवणे म्हणजे कायदेशीर प्रक्रियेचा दुरुपयोग करण्यासारखेच होईल, असा निष्कर्ष न्यायालयाने काढला. याच कायदेशीर पार्श्वभूमीवर उच्च न्यायालयाने फौजदारी अर्ज मंजूर करत या प्रकरणातील एफआयआर आणि विशेष खटला पूर्णपणे रद्द केला आहे.

## अवैध प्रवासी वाहतूक रोखा प्रताप सरनाईकांचे निर्देश,१ मार्चपासून राज्यभर प्रभावी मोहीम

गावकरी

राज्यभरात वाढत चाललेल्या अवैध प्रवासी वाहतुकीमुळे सार्वजनिक सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असून कायदेशीर वाहतूक व्यवस्थेलाही मोठा फटका बसत आहे.परवाना, फिटनेस प्रमाणपत्र, विमा किंवा नियमानुसार परवानगी नसताना प्रवासी ने-आण करणाऱ्या वाहनांमुळे अपघातांचा धोका वाढत असून प्रवाशांचे जीव धोक्यात येत आहेत. अशा अवैध प्रवासी वाहतूकीवर निर्बंध आणावेत त्यासाठी १ मार्चपासून राज्यभर प्रभावी मोहीम राबवावी असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मोटार परिवहन विभागाला (ठढज) दिले. ते या अनुषंगाने विधानभवनात बोलावलेल्या बैठकीत बोलत होते.मंत्री सरनाईक म्हणाले क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी घेणे, वाहनांची नियमित तपासणी न करणे आणि सुरक्षाविषयक नियमांकडे दुर्लक्ष करणे या प्रकारांमुळे अपघातांच्या घटना वाढण्याची

शक्यता अधिक असते. अशा वाहनांना वैध विमा नसल्यास अपघातानंतर प्रवाशांना नुकसानभरपाई मिळवणे कठीण होते. अनेक वेळा वाहनमालक किंवा चालक जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करतात, ज्यामुळे पीडितांना न्याय मिळण्यात विलंब होतो.

नियोजित मार्ग व वेळापत्रकावरही परिणामअवैध वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलालाही मोठे नुकसान सहन करावे लागते. नियम पाळणाऱ्या एसटी महामंडळासारख्या कायदेशीर वाहतूकदारांवर अन्यायकारक स्पर्धेचे ओझे येते. दरकपात आणि अनियमित बाजारपेठेमुळे अधिकृत सेवा आर्थिक अडचणीत सापडतात. एसटी सारख्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील प्रवासीसंख्या घटल्याने नियोजित मार्ग व वेळापत्रकावरही त्याचा परिणाम होतो.व्यापक जनजागृती यावर भर देणे आवश्यकतज्ज्ञांच्या मते, अवैध प्रवासी वाहतूक ही केवळ आर्थिक प्रश्न नसून सामाजिक सुरक्षेचाही मुद्दा आहे. अशा वाहनांमुळे मानवी तस्करी, लुटमार किंवा इतर गुन्ह्यांना खतपाणी मिळू शकते. प्रवाशांची नोंद किंवा तपशील उपलब्ध नसल्याने तपास यंत्रणांना अडचणींचा सामना करावा लागतो. रस्ता सुरक्षेच्या दृष्टीनेही हा प्रकार धोकादायक आहे. वेगमर्यादा भंग, बेदरकार वाहनचालकता आणि नियमांचे उल्लंघन यामुळे अपघात, वाहतूक कोंडी व प्रदूषणात वाढ होते. या पार्श्वभूमीवर मोटार परिवहन विभागाने कडक अंमलबजावणी, नियमित तपासणी मोहीम आणि व्यापक जनजागृती यावर भर देणे आवश्यक असल्याचे मत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केले.दरम्यान, ऑनलाइन आणि पारदर्शक परवाना प्रक्रियेच्या माध्यमातून कायदेशीर वाहतूक सुलभ करणे, तसेच प्रवाशांनीही परवानाधारक सेवांचा वापर करण्याची जबाबदारी स्वीकारणे, ही काळाची गरज आहे. अवैध प्रवासी वाहतुकीवर कठोर कारवाई आणि जनसहभाग या दोनच मार्गांनी सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह वाहतूक व्यवस्था निर्माण होऊ शकते, असे प्रतिपादन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

### सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, धाकलगाव आयोजित रक्तदान शिविरामध्ये ५६ मावळ्यांनी केले रक्तदान.

गावकरी

**शरद माळादे अंबड तालुका प्रतिनिधी** अंबड, दि. २७फेब्रुवारी २०२६ रोजी हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, धाकलगाव यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. आपल्यालाही समाजाचे काही तरी देणे आहे याची जाणीव ठेवून एकूण ५६ मावळ्यांनी रक्तदान केले. पूर्ण आठवड्यामध्ये विविध सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन केले होते. त्यामध्ये गावामध्ये स्वच्छता करणे, शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित चित्रपट दाखवणे इ विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# सरकारी कामासाठी चकरा मारणं विसरा आता घरबसल्या करा तक्रार,थेट PMO घेणार दखल.

गावकरी

रेशन कार्ड मिळत नाहीये? वीज बिल वाढवून आलंय? की पोलीस ठाण्यात तुमची तक्रार घेतली जात नाहीये? सरकारी यंत्रणेच्या कामात अनेकदा सामान्य माणूस भरडला जातो. मात्र, आता तुम्हाला कोणत्याही सरकारी कार्यालयाचे उंबरठे झिजवण्याची गरज नाही.

केंद्र सरकारने सुरू केलेल्या CPGRAMS (सेंट्रलाइज्ड पब्लिक ग्रीवेंस रिड्रेसल अँड मॉनिटरिंग सिस्टम) या पोर्टलमुळे तुम्ही घरबसल्या कोणत्याही सरकारी विभागाविरुद्ध ऑन लाइन तक्रार नोंदवू शकता.

**काय आहे CPGRAMs पोर्टल? :** हे भारत सरकारचे

एक ऑनलाइन प्लॅटफॉर्म आहे, जे नागरिकांना थेट केंद्र आणि राज्य सरकारच्या विभागांशी जोडते. या पोर्टलची सर्वात मोठी ताकद म्हणजे, येथे केलेली तक्रार अधिकारी दुर्लक्षित करू शकत नाहीत. प्रत्येक तक्रारीला एक ट्रॅकिंग नंबर दिला जातो आणि संबंधित विभागाला ठराविक वेळेत त्याचे उत्तर देणे बंधनकारक असते.

**ऑनलाइन तक्रार कशी नोंदवाल?**

१सर्वप्रथम gor tal.gov.in या अधिकृत वेबसाइटवर जा.

२. तुम्ही नवीन वापरकर्ते असाल, तर 'Registration' वर क्लिक करून आपली माहिती भरा.

३. लॉग-इन केल्यानंतर 'Lodge Public Grievance' या पर्यायावर क्लिक करा.

४. येथे तुम्हाला रेल्वे, पोस्ट, टेलिकॉम, बँकिंग अशा अनेक विभागांची यादी दिसेल. तुमचा प्रश्न ज्या विभागाशी संबंधित आहे, तो निवडा.

५. आपली तक्रार सोप्या भाषेत लिहा. तुमच्याकडे काही पुरावे, फोटो किंवा कागदपत्रे असतील तरती 'Uload' करा.

६. फॉर्म सबमिट केल्यानंतर तुम्हाला एक रजिस्ट्रेशन नंबर मिळेल. या नंबरच्या आधारे तुम्ही तुमच्या तक्रारीची सद्यस्थिती कधीही तपासू शकता.

**या पद्धतीचा फायदा काय?**

CPGRAMS पोर्टलची देखरेख वरिष्ठ स्तरावर केली जाते. जर एखाद्या कनिष्ठ अधिकाऱ्याने तुमची तक्रार योग्य कारणाशिवाय बंद केली, तर तुम्हाला त्याविरुद्ध 'Aeel' करण्याचा अधिकार असतो. अनेकदा या पोर्टलवर तक्रार केल्यावर कामाचा वेग 'रॉकेट'च्या वेगाने वाढतो, कारण ही तक्रार थेट मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास येते.

# चिखला जिल्हा परिषद क्षेत्रातील तिन्ही जलकुंभ कोरडे

## अर्धवट बांधकाम ; निधीचा ठणठणात जल जीवन मिशन योजना पांढरा

गावकरी

**भंडारा: खेमराज शरणांगत,** तुमसर:२८ फेब्रुवारी चिखला जिल्हा परिषद क्षेत्रांतर्गत असलेल्या हिरापूर हमेशा, मोहगाव खुर्द व सक्करधरा येथील जलकुंभ निधीची कमतरता व अर्धवट बांधकामामुळे या तिन्ही गावचे जलकुंभ कोरडे पडले आहेत. जल जीवन मिशन योजना पांढरा हत्ती ठरल्याचे सांगितले जात आहे. हिरापूर,मोहगाव खुर्द व सक्करधरा ही आदिवासी गावे आहेत.येथील नागरिकांची तहान भागविण्यासाठी जल जीवन मिशन योजने अंतर्गत हर घर नल योजना सुरू करण्यात आली होती. दोन वर्ष लोटूनही जलकुंभाचे बांधकाम अर्धवट असल्याने जलकुंभ कोरडे असल्याचा प्रकार निदर्शनास आलेला आहे. यामुळे गावकऱ्यांची पाण्यासाठी भटकंती होत आहे. हिरापूर, मोहगाव खुर्द व सक्करधरा गावातील नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा करण्यासाठी जल जीवन मिशन योजने अंतर्गत या प्रशासकीय कामाला २०२१ मध्ये मंजुरी देण्यात आली असून २०२२ ला कार्यारंभ आदेश सुद्धा देण्यात आले आहे. यात योजना पूर्ण करण्याचा कालावधी २०२३

**सकरधरा, हिरापूर हमेशा व मोहगाव खुर्द या तिन्ही गावाच्या जल कुंभाचे बांधकाम अर्धवट असून जल जीवन मिशन योजना गावकऱ्यांसाठी दिवा स्वप्न ठरणारी झाली आहे. अर्धवट बांधकाम त्वरित पूर्ण करण्यात यावे यासाठी पंचायत समिती तुमसरला आमदाराच्या जनता दरबारात सदर प्रकरण उचलून धरण्यात आला परंतु कोणतीही दखल घेण्यात आली नाही.** दीपक कल्याण उईके,सरपंच ग्रा.पं. धुटेरा /घानोळ

**सक्करधरा,हिरापूर हमेशा व मोहगाव खुर्द या तिन्ही गावच्या अर्धवट जल कुंभाच्या बांधकामाबाबत जिल्हा परिषद भंडारा येथे सदर प्रकरण उचलून धरला असता संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून निधीची कमतरता असल्या चे सांगण्यात आले.**
कृष्णकांत बघेल,जिल्हा परिषद सदस्य चिखला क्षेत्र.

असून आज दोन वर्षाचा कालावधी लोटूनही नागरिकांच्या दारात पाणी पोहोचले नसल्यानें नागरिकांच्या मनात असंतोष खदखदत आहे. तर याकडे लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष असल्याचेही सांगितले जात आहे.

धुटेरा ही गट ग्रामपंचायत आहे. सक्करधरा, घानोड, हिरापूर हमेशा व मोहगाव खुर्द या गावांचा समावेश असून यातील अंतर ८ ते १० किलोमीटरचा आहे. यात सक्करधरा व घानोड या गावचा अंतर मात्र दीड ते दोन किलोमीटरचा असल्यामुळे नवीन गट ग्रामपंचायतच्या निर्मितीची ओरड सुरू आहे. असे झाल्यास विकास कामाला गती मिळणार असल्याची शक्यता ग्रामवासियांनी वर्तवली आहे. सक्करधरा, घानोळ, हिरापूर हमेशा व मोहगाव खुर्द या गावचा प्रशासकीय कारभार धुटेरा ग्रामपंचायत मधून चालविला जात आहे. शासनाची कोणतीही योजना असेल तिच्यावर देखरेख करण्यासाठी अधिकारी व पदाधिकारी गावाला भेट देत नाहीत ही मोठी शोकांतिका आहे. गावकऱ्यांना लांब पल्ल्याचे अंतर गाठून आवश्यक कामे करावी लागत आहेत.